Name - Swarupa Nikesh Sankhe
Std - VII Div - Lotus Roll No - 26

Marathi 1st Rank

## निसर्गाचा शत्रू प्रदुषण

निसर्गाचा सगळ्यात मोठा शत्रू कोण ? प्रदुषण

प्रदुषण ही निसर्गाला लागलेली सर्वात मोठी कीड आहे आज मोठ्या प्रमाणावर निसर्गाचा जो ऱ्हास होत आहे त्याला कारणीभूत म्हणजे हे प्रदुषण आहे अतिशय सुंदर असणारा निसर्ग आज या प्रदुषणरूपी आजाराने जडला आहे. हवेत, पाण्यात, वातावरणात असे काही घटक स्थिरावतात की ज्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते व प्रदुषण होते

आजच्याघडीला प्रदुषणाची मुख्य तीन प्रकार आहेत ते म्हणजे जल प्रदुषण, ध्वनी प्रदुषण आणि वायु प्रदुषण. मानवाने विकासाच्या हव्यासापोटी अनेक संशोधन केले, शोध लावले, नवीन तंत्रज्ञान विकसित केले मात्र त्याचबरोबर निसर्गाचा देखील तेवढाच अपव्यय केला. कारखाने, फॅक्टरी, दवाखाने बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड केली

रस्त्याकाठची झाडे तोडून रस्ता रुंदीकरण केले झाडे तोडल्यामुळे आणि पशू पक्ष्यांची संख्या कमी झाल्याने निसर्गाचे चक्र कोलमडले. पूर्वी नियमित पडणारा पाऊस आज क्वचितच पडत आहे. सुनामी, चक्रीवादळ, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीत वाढ झाली आहे

झाडे कमी झाली, पावसाचे प्रमाण कमी झाले त्यामुळे वातावरणातील उष्णता वाढून ग्लोबल वॉर्मिंग सारखी जागतिक समस्या निर्माण झाली आहे. मोबाईल आणि मोबाईलच्या टॉवर मधून निघणाऱ्या आलाघाती सिग्नलमुळे कित्येक पक्षी

त्याचे आयुष्य संपवत आहेत त्याच कारणाने आज पक्ष्यांची संख्या घसरत आहे.

मानव आजही परिस्थिती बदलू शकतो, झालेल्या चुका सुधारू शकतो. झाडे लावून, पशू पक्ष्यांचे संगोपन करून निसर्गाचा समतोलन राखू शकतो. पण जर निसर्गाचा समतोलन राहिला नाही तर भविष्यात पृथ्वीवरील सजीवांच्या अस्तित्वाला नक्कीच धोका आहे.

 झाडे लावा, झाडे जगवा 